## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१४/०९/२०१६

**१) घरातील सोन्याच्या अंगठया व नगदी पैश्याची चोरी  . :—**

दिनांक १३/०९/२०१६ रोजी १४.४५ वा. दर. यातील फिर्यादी श्रीमती चंद्रभागा दयाराम भुरले वय ६५ वर्ष, रा. गांधी वार्ड पहेला आपल्या घराच्या समोरील दाराला ताला लावुन गहु पिसण्याकरीता आटा चक्कीवर गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण फिर्यादीचे घराचा समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या गोदरेज आलमारीचा ताला तोडुन त्यामधुन ३ नग सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ४ ग्रॅम एकुण १२ ग्रॅम व नगदी २५,०००/—रु. असा एकुण ३२,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४५४,३८० भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शेख पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) शुल्लक कारणावरुन भांडण व शिविगाळ करुन काठीने मारुन जखमी केले  . :—**

दिनांक १३/०९/२०१६ रोजी ०८.०० वा. दर. फिर्यादीस आरोपी क्र. २ हीने आमच्या दारासमोर अंगणात कचरा का फेकली असे बोलुन फिर्यादीस शिवीगाळ करुन भांडण केले असता आरोपी क्र. १ याने माझे पत्नी सोबत भांडण का करते असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण व शिवीगाळ करुन काठीने फिर्यादीचे उजवे मांडीवर उजवे हातावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) फेसबुकच्या अकाउन्ट अश्लिल फोटो प्रसारीत करुन तरुणीचा विनयभंग  . :—**

दिनांक १३/०९/२०१६ चे पुर्वी पासुन यातील फिर्यादीचा फोटो व अश्लिल मजकुर फेसबुकचे अंकाऊट वरुन प्रसारीत करण्यात आला असुन याबाबत फिर्यादीने आरोपीवर संशय व्यक्त केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४(अ)(१)(४) भांदवि सहकलम ६७ माहीती तंत्रज्ञान अधी. २००० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४)इलेक्ट्रीक करंट लागुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—**

दिंनाक. १३/०९/२०१६ रोजी १४.३० वा. दर. यातील मृतक राजकुमार वामन रोकडे वय ५० वर्ष, रा. जेवनाळा हा विलास लामकाने रा. जेवनाळा यांचे शेतावर इलेक्ट्रीक दुरुस्ती करीता गेला असतांना त्यास इलेक्ट्रीक करंट लागल्याने त्याचे नातेवाइकांनी औषधोपचारा करीता गारु पालांदुर येथे आनले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे. पालांदुर हे करित आहेत.

**५) विष प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिंनाक. १२/०९/२०१६ रोजी २१.०० वा. दर. यातील मृतक भगवान नरेश बावने वय ३० वर्ष, रा. कारधा याने दि. १२/०९/२०१६ रोजी २०.१० वा. आपल्या घरी विष प्राशन केल्याने त्यास सा. रु. भंडारा येथे औषधोपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करित आहेत.

**४) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक १३/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, जवाहरनगर, लाखांदुर व तुमसर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २५ लिटर हातभट्टी दारू कि. २,०००/—रू. व १ लिटर ८०० मिली देशी दारू कि. ५००/—रू. तसेच जुगारातुन कि. ७०२ /—रु. असा एकुण ३,२०२/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १३/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस, अवैध प्रवासी ०२ केसेस तसेच ईतर वाहनांवरती ८८ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.